जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक ०४.०१.२०२५**

**‘‘ गावठी बनावटीचे एक अग्निशस्त्र, सहा जिवंत काडतुसे विक्री करण्याकरीता आलेल्या सराईत गुन्हेगारास अटक’’**

---

दिनांक ०४.०१.२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक—४, उल्हासनगर चे पोशि/ ६६६३ राजेंद्र थोरवे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम त्याच्या ताब्यातील अग्निशस्त्र विक्री करण्याकरीता मांजर्ली, शनीनगर, बदलापुर पश्चिम येथे येणार आहे. त्या अनुषंगाने वपोनि/श्री.अशोक कोळी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सपोउनि/बबन बांडे व त्यांचे पथक यांनी बदलापुर पश्चिम येथील मांजर्ली, शनीनगर भागात हेरंबप्रसाद सोसायटी कडुन नाल्याकडे जाणाऱ्या रोडवर सापळा रचुन इसम नामे महेंद्र हरिशचंद्र बागुल उर्फ पप्पु, वय ४९ वर्ष, रा.बदलापुर पश्चिम यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र व ६ जिवंत काडतुसे मिळुन आले.

सदर घटनेबाबत आरोपीविरूध्द बदलापुर पश्चिम पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यास अटक करण्यात आली आहे. तसेच त्याचा गुन्हे अभिलेख पडताळला असता त्याच्यावर यापुर्वी अंबरनाथ, बदलापुर येथे खुन व खुनाचे प्रयत्न यासारखे गंभीर गुन्हे दाखल असुन सध्या बदलापुर पुर्व पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. । १८१/२०२२ भा.द.वि. कलम ३४१,३२३,५०६,३४ सह शस्त्र अधिनियम ३,२५ आणि रायगड जिल्हयातील नेरळ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ।१५९/२०२२ भा.द.वि. कलम ३०७ शस्त्र अधिनियम ३,२५ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयात तो फरार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंग जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध—१) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/श्री.अशोक कोळी, सपोउनि/बबन बांडे, पोहवा/गावडे, पोहवा/वाघ, पोहवा/चंद्रकात सांवत, पोहवा/मंगेश जाधव, पोशि/राजेंद्र थोरवे, पोशि/शेरमाळे, पोशि/उगले सर्व नेमणूक गुन्हे शाखा, घटक—४, उल्हासनगर यांनी केलेली आहे

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर